**नमुना क्रमांक**
**भाग 'अ'**
**न्यायनिर्णय**

| | |
|---|---|
| | **विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग देवगड तालुका देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग. (पिठासीन अधिकारी श्रीकांत एस. पचंडी) (दिनांक १५/०६/२०२६) संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ९७/२०२५ सी.एन.आर.क्र.एमएचएसआय ०९०००२४६२०२५ निशाणी क्र.९ लगत** |
| | (गुन्हा क्रमांक २२/२०२५, देवगड पोलीस ठाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग ) |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे देवगड पोलीस ठाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |
| सरकारतर्फे | श्री. एम.जी.काळदाते, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | १) हर्षद रमेश लाड<br>वय- ३७ वर्षे, धंदा- मोलमजुरी<br>रा. जामसंडे बाजारपेठ, ता.देवगड<br><br>२) श्रीकांत रेवाप्पा घेवारी<br>वय- ६० वर्षे, धंदा- मोलमजुरी<br>रा. देवगड सडा, ता.देवगड |
| आरोपीतर्फे | विद्वान वकील श्रीमती ए.ए.गोरे |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेल्याची तारीख | १४/०६/२०२५ |
| प्रथम छापील खबर दिनांक | १४/०६/२०२५ |
| अंतिम अहवाल दाखल झाल्याचा दिनांक | १६/०६/२०२५ |
| गुन्ह्याचे प्रतिकथन नोंदवल्याची तारीख | ०३/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | १५/०६/२०२६ |
| शिक्षा सुनावणीची तारीख, असल्यास | -- |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटणेची तारीख | गुन्हयाचे आरोपसह | निर्दोष असो वा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ करिता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हर्षद रमेश लाड | -- | १९/०८/२०२५ | महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| २. | श्रीकांत रेवाप्पा घेवारी | -- | १९/०८/२०२५ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |

### भाग 'क'

**अ. अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| सा.क्र.१ | प्रविण मनोहर सावंत | फिर्यादी |
| सा.क्र.२ | निमेश नंदकिशोर कोयंडे | पंच |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असतील तर :–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असतील तर :–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | – | – |

**ड. फिर्यादी/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांची यादी :–**

**अ. अभियोग पक्ष :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी१/पी.डब्ल्यू १ | फिर्याद |
| २. | पी२/पी.डब्ल्यू२ | पंचनामा |

**ब. बचाव पक्ष :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | – |

## क. न्यायालयीन निशाणी :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | – |

## ड. भौतिक वस्तु :–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम.ओ.नं.१, २, ३ | पावती पुस्तक, बॉलपेन, कार्बन पेपर |

सदर प्रकरणामध्ये आरोपी क्र.१ व २ यांचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. आरोपी क्र.१ व २ यांनी त्यांच्या विरुध्द खोटी केस असल्याचा बचाव घेतला आहे.

०२. अभिलेखाचे अवलोकन केले. अभियोग पक्षातर्फे सदर प्रकरणात दोन साक्षीदार तपासण्यात आले आहेत. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावर आलेला साक्षी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता, तसेच आरोपी क्र.१ व २ यांच्या तर्फे वकील यांचा युक्तीवाद यातून याकामी उपस्थित होणारे प्रश्न व त्यावरील उत्तरे कारणांसहित खालील प्रमाणे नोंदविलेली आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | दि.१४/०६/२०२५ रोजी दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे जामसंडे बस स्टॅण्डचे बाजुला आरोपी क्र.१ व २ यांनी स्वत:च्या | |

| | | |
|---|---|---|
| | फायद्यासाठी कल्याण मटका नावाच्या जुगाराचे आकडयावर सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे स्विकारुन जुगार खेळ खेळवित असताना, जुगाराचे साहीत्य व रोख रकमेसह मिळून आले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | .... नाही. |
| २. | अंतिम आदेश ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### प्रश्न क्र. १ करीताः–

०३. अभियोग पक्षाचे सा.क्र.१ प्रविण सावंत यांच्या सरतपासात असे आले आहे की, दि.१४/०६/२०२५ रोजी ते देवगड पो.स्टे येथे हजर असताना अशी विश्वसनीय माहिती मिळाली की, जामसंडे बाजारपेठ येथे कल्याण नावाचा जुगार घेतला जातो. सदर बातमी पोलिस निरीक्षक यांना दिली. त्यानंतर ते स्वतः, पी. एस. आय भालेराव, पो.हे.कॉ. शिरगावकर, पो.हे.कॉ. नाटेकर, सोबत दोन पंच यांना घेऊन शासकीय वाहनाने जामसंडे बस स्टॅण्ड येथे गेले. वाहन बस स्थानकाच्या जवळ उभे केले. त्यानंतर त्यांना असे दिसून आले की, बस स्टॅण्डच्या बाजूस एक इसम हातामध्ये पावती पुस्तक घेऊन उभा आहे. त्याच्या समोर एक इसम हातात पैसे घेऊन पावती करताना दिसून आला. सदर इसमास त्यांची चाहूल लागताच तो पळून गेला पावती घेणारा इसम नामे हर्षद लाड यास ताब्यात घेतले. त्याच्या

कडून रोख रक्कम १५००/–, एक बॉलपेन, एक कार्बन पेपर, 14K असे नमुद ड्युप्लिकेट आकडेमोड केलेले पावती पुस्तक जप्त केले. आरोपी याच्याकडे चौकशी केली असता त्याने असे सांगितले की, दुसरे आरोपी श्रीकांत घेवारी याच्या सांगण्यावरुन तो आकडेमोड लिहून घेत होता. तसेच जमा होणारी रक्कम तो श्रीकांत घेवारी यांच्याकडे देत असे. पी. एस. आय. भालेराव यांनी घटनास्थळी पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन येथे येऊन दि.१४/०६/२०२५ रोजीची फिर्याद नि.क्र.पी.१/पी.डब्ल्यू १ दिली. त्यांनी एम.ओ.नं. १, २, ३ पावती पुस्तक, बॉलपेन, कार्बन पेपर जप्त केले असे सांगितले. सदर साक्षीदाराने उलटतपासात, घटनास्थळ हे बाजारपेठेचे ठिकाण असून तेथे वाहन व माणसांची वर्दळ असते, जप्त मुद्देमालापैकी पावती पुस्तक, पेन, कार्बन हे सर्वसामान्यपणे दुकानात उपलब्ध असतात, मुद्देमाल सिल नाही या बाबी मान्य केल्या आहेत. त्याचप्रमाणे आरोपीतर्फे देण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना स्पष्ट नकार दिला आहे.

०४. अभियोग पक्षाचे सा.क्र.२ निमेश कोयंडे यांच्या सरतपासात असे आले आहे की, दि.१४/०६/२०२५ रोजी पोलिसांनी त्यांना जामसंडे येथे बोलवले होते. त्यांच्या सोबत पोलीस होते. पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांनी मटक्याच्या आकडावाल्याला पकडले. पोलिसांना १५००/– रुपये रक्कम मिळाली तसेच पोलिसांना पेन, लिहायची शीट मिळाली. पोलीसांनी त्यांच्या समोर लिखापढी केली. पोलिसांनी त्यांची सही घेतली. पोलिसांनी दि.१४/०६/२०२५ रोजीचा घटनास्थळ पंचनामा नि.क्र.पी.२/पी.डब्ल्यू२ केला असे सांगितले. पोलिसांनी एम.ओ.नं.१ पावती पुस्तक, एम.ओ.नं.२ बॉलपेन, एम.ओ.नं. ३ कार्बन पेपर जप्त केले असे सांगितले. सदर साक्षीदाराने उलटतपासात, समन्सवरील व

पंचनाम्यावरील सही वेगवेगळ्या आहेत, त्यांची पोलिसांशी ओळख आहे, पोलिसांच्या सांगण्यावरुन ते एखादे काम करतात या बाबी मान्य केल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे प्रस्तुत साक्षीदार यांनी आपल्या उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, पंचनाम्यातील मजकूर त्यांना सांगता येणार नाही. आरोपीतर्फे देण्यात आलेल्या उर्वरित सुचक प्रश्नांना स्पष्ट नकार दिला आहे.

०५. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन करता, पंच साक्षीदार यांनी आपल्या उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांना पंचनाम्यातीला मजकूर सांगता येणार नाही. यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत साक्षीदार हा आपल्या उलटतपासामध्ये आपल्या सरतपासातील कथनांवर ठाम राहिलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत पंच साक्षीदार हा विश्वासार्ह वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुत पंच साक्षीदार याच्या साक्षीवर भिस्त ठेवून कोणत्याही निष्कर्षाप्रत येणे न्यायोचित वाटत नाही. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणी दुसरा पंच साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत खटल्यातील मुद्देमाल हा आरोपी यांच्या ताब्यातून जप्त केला होता हे अभियोग पक्ष शंकेच्या पलीकडे जाऊन शाबीत करु शकलेले नाही.

०६. तसेच आरोपी कडून रोख रक्कम, बॉलपेन, पावती पुस्तक, कार्बन पेपर जप्त करणे म्हणजे ती व्यक्ती जुगार खेळत होती असा निष्कर्ष काढणे योग्य नाही, तर याबाबत आरोपी जुगार खेळत होता म्हणजे काय करत होता याबाबतचा पुरावा समोर येणे आवश्यक आहे. आरोपी क्र.1 व २ हे लोकांकडून पैसे घेवून कोणत्या अंकावर व किती रकमेचा जुगार खेळत होते याचे स्पष्टीकरण अगर खुलासा करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपी आरोपी क्र.1 व २ हे मटका नावाचा जुगार खेळत होते व तेथे उपस्थित काही लोकांची तपास टिपणे

घेऊन त्यांची साक्ष अभियोग पक्षाने घेणे आवश्यक होते, परंतु तसे घडले नाही. त्यामुळे सदरचा मुद्देमाल हा आरोपी क्र.१ व २ यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला होता याबाबत साशंकता निर्माण होते. यापूर्वी नमूद केले प्रमाणे केवळ रोख रक्कम, बॉलपेन, पावती पुस्तक, कार्बन पेपर आढळणे म्हणजे जुगार खेळणे असा निष्कर्ष निघत नाही. जरी फिर्यादी यांनी मुद्देमाल जप्त केल्याचे सांगितले असले तरी जप्त केलेले साहीत्य हे आरोपी क्र.१ व २ यांच्या ताब्यातून जप्त केले या सर्व गोष्टीबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपी क्र.१ व २ यांच्या विरूध्दचा गुन्हा सिध्द होत नाही. सबब, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नाही म्हणून देण्यात येतो.

**प्रश्न क्र. २ करीताः–**

०७. अभियोग पक्षाचा पुरावा पाहता, कथित घटनेमध्ये आरोपीचा सहभाग सिध्द होत नाही. सरकार पक्षाचा पुरावा अत्यंत त्रोटक व असमाधानकारक आहे. त्यामुळे केवळ संशयाचा फायदा देऊन आरोपी निर्दोष मुक्त करणे उचित होईल.

०८. सदर कामी जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये १,५००/– हे अपील कालावधी संपल्यानंतर सरकार जमा होणेबाबत व इतर मुद्देमाल म्हणजे पावती पुस्तक, एक बॉलपेन, कार्बन पेपर हे नष्ट करणेबाबत हुकूम होणे आवश्यक आहे. सबब, उपलब्ध पुरावा व मुद्दा क्र.१ चा माझा निष्कर्ष लक्षात घेता, मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षाबाबत मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ हर्षद रमेश लाड व आरोपी क्र.२ श्रीकांत रेवाप्पा घेवारी यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | जप्त रोख रक्कम रु.१,५००/– हे अपील कालावधी नंतर सरकार जमा करण्यात यावेत. तसेच दोषारोपपत्रातील अ.क्र.१४ येथे नमुद असणारा जप्त मुद्देमाल एक पावती पुस्तक, निळया शाईचे बॉलपेन, कार्बनचा तुकडा हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधी नंतर नष्ट करण्यात यावेत. |
| ३. | आरोपी क्र.१ व २ यांचे जातमुचलके भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१(१) अन्वये पुढील सहा महिन्यांच्या कालावधी करीता पुढे कायम करण्यात येत आहेत. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.06.15 17:54:10 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः १५/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड